**प्रेस नोट** **दि.१८/०५/२०१९**

**खडकी पोलीस स्टेशन,पुणे शहर**

**'भरकटलेल्या वयोवृध्द महिलेचे नातेवाईकांचा शोध लावला.'**

दि. ०९/०३/२०१९ रोजी दुपारी ०३/३० वा. चे सुमारास एक ७५ वर्षाची वयोवृध्द महिला खडकी पोलीस ठाणे हद्दीत रेंजहिल बोगदा चौकात गरबडलेल्या अवस्थेत म. पोलीस शिपाई ५२९६ पवार खडकी पोलीस ठाणे पुणे शहर यांना मिळुन आली. सदर महिलेची अवस्था पाहुन म. पोलीस शिपाई ५२९६ पवार यांनी त्यांचे जवळ जावुन त्यांची विचारपुस केली असता सदर महिला त्यांचे राहते घराचा पत्ता मिळुन येत नसुन भरकटलेल्या अवस्थेत रेंजहिल बोगदा चौकात आल्याचे समजले. त्यांचा राहणेचा पत्ता त्यांना विचारला असता त्या केवळ खडकी बाजार येवढाच पत्ता सांगत होत्या.

सदर महिलेचा म.पो.ना. पवार यांनी मोबाईलव्दारे फोटो काढुन त्या महिलेबाबत खडकी बाजार परिसरामध्ये बिट मार्शल चे कर्मचारी यांचे मदतीने शोध घेतला असता ती महिला इंदिरानगर वसाहत येथे राहणेस असल्याची माहिती मिळाली तदनंर सदर महिलेचे फोटोवरुन इंदिरा नगर वसाहत खडकी परिसरातील लोकांकडे विचारपुस केली असता सदर महिला ही गोविंद जगन्नाथ कांबळे रा. इंदिरानगर वसाहत, खडकी पुणे यांचे घरी राहणेस असल्याची माहिती मिळाली त्यावर सदर इसमाचा शोध घेवुन ते मिळुन आल्याने त्यांना सदर वयोवृध्द महिलेबाबत कळवीले असता त्यांनी ते देखील सदर वयोवृध्द महिलेचा शोध घेत होते असे समजले. सदर वयोवृध्द महिला ही गोविंद जगन्नाथ कांबळे यांची आई असल्याची खात्री झालेवरुन सदर महिलेस त्यांचे ताब्यात सुखरुप देणेत आले आहे.

**( भागवत मिसाळ )**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
खडकी पोलीस स्टेशन, पुणे.